# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १६ वा गुरूवार दि.१३ जून २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS LAT SWITCHGEARS INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com


# तब्बल दहा वर्षानंतर काँग्रेसला मिळणार लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपद

नवी दिल्ली; लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने ९९ जागा जिंकल्यामुळे या संख्याबळाच्या आधारावर तब्बल दहा वर्षांच्या कालावधीनंतर काँग्रेस पक्षाला लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपद मिळणार आहे. त्यामुळे संसदेच्या सभागृहात काँग्रेसचा आवाज बुलंद होणार आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपद एखाद्या राजकीय पक्षाला मिळण्यासाठी सभागृहातील एकूण जागांपैकी १० टक्के जागा त्या पक्षाकडे असणे आवश्यक आहे. या नियमानुसार, काँग्रेसला ५४३ सदस्यांच्या लोकसभेत विरोधी पक्षनेते पद मिळण्यासाठी ५४ जागांवर विजय मिळणे आवश्यक होते. या निवडणुकीत काँग्रेसने ९९ जागा जिंकल्यामुळे विरोधी पक्षनेते पद मिळण्यासाठी काँग्रेसला अडचण उरली नसल्याचे सूत्रांनी सांगितले.

काँग्रेसला २०१४ च्या सोळाव्या लोकसभेत फक्त ४४ जागा मिळाल्या होत्या. त्यानंतर २०१९ च्या सतराव्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला अवघ्या ५२ जागांवर विजय मिळाला होता. त्यामुळे लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदाने काँग्रेसला हुलकावणी दिली होती. मात्र, यंदाच्या अठराव्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने चांगली कामगिरी बजावल्यामुळे विरोधी पक्षनेतेपद काँग्रेसकडे जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद धोक्यात राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद सध्या काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांच्याकडे आहे. मात्र, काँग्रेसचे राज्यसभेतील दोन खासदार लोकसभेवर निवडून



आल्यामुळे संख्याबळ कमी होऊन काँग्रेसचे वरिष्ठ सभागृहातील विरोधी पक्षनेतेपद धोक्यात आले आहे.

राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद टिकविण्यासाठी काँग्रेसला सदस्यसंख्या २८ असणे आवश्यक आहे. काँग्रेसकडे आतापर्यंत ही संख्या होती. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे राज्यसभा खासदार के.सी वेणूगोपाळ केरळमधून तर दीपेंद्र हुड्डा हरियाणातून निवडून आले. मध्यप्रदेशातून दिग्विजयसिंग यांनी निवडणूक लढवली, पण ते पराभूत झाले. त्यामुळे काँग्रेसची राज्यसभेतील एक जागा वाचली.

मात्र, दोन सदस्यांच्या लोकसभेतील विजयामुळे काँग्रेसचे राज्यसभेतील संख्याबळ एकूण २४३ जागांच्या दहा टक्के म्हणजे, २८ पेक्षा दोनने कमी झाले आहे. परिणामी, काँग्रेसचे राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद अडचणीत आले आहे. आगामी काळात राज्यसभेच्या या दोन जागा जिंकून आवश्यक संख्याबळ मिळविणे, काँग्रेससाठी अवघड आहे.

केरळमधून राज्यसभेवर ३ खासदार पाठविण्यासाठी निवडणुकीला १ वर्ष अवकाश आहे. राजस्थानात राज्यसभेच्या एका जागेसाठी १०१ आमदारांचा पाठिंबा आवश्यक आहे. काँग्रेसकडे इतके आमदार नसून भाजपची आमदार संख्या ११५ आहे. त्यामुळे राजस्थानात एकही जागा जिंकणे काँग्रेसला शक्य नाही.

हरियाणात राज्यसभेसाठी ४६ आमदारांचा पाठिंबा आवश्यक आहे. काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांकडे संख्याबळासाठी आवश्यक आमदार नाहीत. भाजपकडे ४३ तर काँग्रेसकडे २९ आमदार आहेत. जननायक जनता पार्टीने कांग्रेसला पाठिंबा दिला तरीही काँग्रेसचे संख्याबळ ४६ पर्यंत पोहोचत नाही. हरियाणातूनही एक जागा जिंकण्याची संधी नसल्याने राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपदही काँग्रेसच्या हातून जाण्याची शक्यता आहे. याउलट भाजपची सदस्य संख्या वाढल्याने राज्यसभेत कुठलेही विधेयक पारित करण्यात रालोआ सरकारला अडचण येणार नसल्याचे सूत्रांनी सांगितले.

# अजित पवारांना सोबत घेणे ही भाजपची चूक



पुणे – लोकसभा निवडणुकीत भाजपला स्वबळावर बहुमताचा आकडा पार करता आला नाही. त्यासाठी ३२ जागा कमी पडल्या. या पराभवासाठी नरेंद्र मोदींच्या लोकप्रियतेपुढे सामान्य भाजप कार्यकर्त्यांचा, पाठीराख्यांचा आवाज भाजपने ऐकला नसल्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) मुखपत्र 'ऑर्गनायझर' मधील लेखातून म्हटले आहे. अजित पवारांना सोबत घेऊन भाजपने चूक केली असेही या लेखात म्हटले आहे.लोकसभा निकालाचे विश्लेषण अजूनही सुरू आहे. भारतीय जनता पक्षाने 'चारशे पार'चा नारा दिला होता. वास्तविक त्यांना बहुमतासाठीचा आकडाही स्वबळावर गाठता आला नाही. संघाचे आजीव सदस्य रतन शारदा यांनी 'ऑर्गनायझर' साप्ताहिकात 'मोदी ३.०: कन्व्हर्सेशन फॉर कोर्स करेक्शन' लेखातून भाजप नेत्यांच्या डोळ्यात अंजन घातले आहे. या लेखात म्हटले आहे की, भाजपच्या पराभवाला त्यांनी केलेले नको असलेले राजकारण कारणीभूत ठरले आहे.त्यासाठी त्यांनी महाराष्ट्राचे उदाहरण दिले. महाराष्ट्रात भाजप आणि एकनाथ शिंदेंची शिवसेना यांचे बहुमत असलेले सरकार असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवारांना सोबत घेण्याची काय गरज होती, असा सवाल या लेखातून रतन शारदा यांनी केला आहे.

# रामवाडी, कारेपूर येथे प्रत्येकी दहा लाख रुपयांच्या विकासनिधी मंजूर लोकसभा निवडणुकीत अत्यंत चांगले काम केले;

लातूर : – लातूर ग्रामीण मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांनी लोकसभा निवडणुकीत अत्यंत चांगले मनापासून काम केले असून या पुढील काळात होणाऱ्या प्रत्येक निवडणुकीतही गावागावातील भाजपा कार्यकर्त्यांनी एकमेकांच्या विचाराने आणि जिद्दीने काम करून भाजपाचे मताधिक्य वाढवण्याचा प्रयत्न करावा असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.




भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर तालुक्यातील मौजे रामवाडी ख. येथील ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी दहा लाखाचा आणि मौजे कारेपूर येथील हनुमान मंदिर परिसरात सभा मंडप बांधकामासाठी दहा लाखाचा निधी आपल्या स्थानिक आमदार निधीतून मंजूर केला. सदरील निधी मंजूर केल्याबद्दल दोन्ही गावच्या ग्रामस्थांनी बुधवारी दुपारी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात आ. कराड यांचा यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले. यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, रेणापूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे आणि किसान मोर्चाचे साहेबराव मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.


रामवाडी आणि कारेपूर येथील ग्रामस्थांशी संवाद साधताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, रामवाडी हे गाव पूर्वीपासून भाजपाचा बालेकिल्ला आहे तर कारेपूर येथील सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी लोकसभा निवडणुकीत अटीतटीची लढत असतानाही मनापासून काम केले आणि भाजपाला चांगले मताधिक्य मिळवून दिले. त्याबद्दल दोन्ही गावच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन करून येणाऱ्या काळात होणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत प्रत्येक कार्यकर्त्यांनी एकमेकांच्या विचाराने मन लावून जबाबदारीने काम केल्यास शंभर टक्के यश मिळते यात शंका नाही असे बोलून दाखविले.

भाजपाचे प्रमुख कार्यकर्त्यांनी जबाबदारीने वागून सर्वसामान्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करावे, गावातील प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी व्हावे त्याचबरोबर ग्रामस्थांच्या सार्वजनिक आणि वैयक्तिक कामाकडे लक्ष द्यावे अशी सूचनाही यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड यांनी केली.

यावेळी रामवाडी येथील सरपंच पांडुरंग कलूरे, उपसरपंच करण सुरवसे, शालिकराम गोडभरले, भूषण उगले, नामदेव गोडभरले, गणपती कोलपाक, भीमराव दिवटे, सूर्यकांत सुरवसे संजय गोडभरले, पुंडलिक दिवटे, ज्ञानेश्वर गोडभरले, नितीन गोडभरले, मधुकर गोडभरले आणि कारेपूर येथील भाजपाचे भाऊसाहेब गुलबिले, माजी सरपंच दगडू महाराज पुरी, माजी सरपंच राजेश काळे, ओमकारआप्पा क्षीरसागर, शंकर माने, चांद शेख, धोंडीराम ठोंबरे, ऋषिकेश गायकवाड, माणिक सुरवसे, प्रकाश साळवे, सुरज पल्ले, ओम चव्हाण, बाबासाहेब साळवे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# आता मोदी सरकार नाही तर एनडीए सरकार आलंय : उद्धव ठाकरे

तिसऱ्यांदा मोदी सरकार येउन देखील काश्मीरमध्ये हल्ले सुरूच आहेत. काश्मीर पुन्हा पेटलंय, ३७० कलम काढलं नव्हे तर ते होल्डवर ठेवलंय. वर्षभरानंतर का होईना भागवत मणिपूरवर बोलले. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा आतातरी मणिपूरमध्ये जाणार आहेत का? भागवतांचं बोलण मोदी आतातरी गांभीर्याने घेणार आहेत का? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.



पदवीधर मतदारसंघातून अनिल परब यांना ठाकरे सेनेकडून उमेदवारी देण्यात आली आहे. अनिल परबांच्या जाहिरनाम्याचं उद्धव ठाकरें यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी माध्यमांशी ते बोलत होते.

मुंबई पदवीधर मतदारसंघातून अनिल परब यांना उमेदवारी देण्यात आली आहे. परब यांच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन केल्या प्रसंगी उद्धव ठाकरे यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. कोकण, नाशिकच्या जागेत काँग्रेस आणि शिवसेनेत वाटाघाटी होतील असे ते म्हणाले. दरम्यान माझं पदवी प्रमाणपत्र खोटं नाहिए म्हणत त्यांनी मोदींना टोला लगावला.

# नागरसोगा उपकेंद्रातून आता अतिरिक्त दाबाने होणार विजपुरवठा शेतकऱ्यांसाठी आमदार अभिमन्यू पवारांची पैरवी....

## आरडीएसएस अंतर्गत मंजूर कामे लवकरच मार्गी लागणार...

आरडीएसएस अंतर्गत मंजूर आशिव, उजनी, लिंबाळा, याकतपूर, सयाखान चिंचोली, रामलिंग मुदगड आणि बोरफळ या ७ नवीन उपकेंद्रासंदर्भातील सर्व प्रक्रिया पूर्ण झाली असून पुढील काही दिवसात कामे प्रत्यक्षात सुरु करण्यात येणार असून औसा विधानसभा मतदारसंघात शेतकऱ्यांना उच्च दाबाने व अखंडित विद्युत पुरवठा होण्यासाठी मदत होणार असल्याचे माहिती आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितली...

औसा – आ अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्यामुळे मुख्यमंत्री कृषी सोलार योजनेअंतर्गत औसा तालुक्यातील सर्व ओव्हर लोड उपकेंद्राची क्षमतावाढ आरडीएसएस योजनेतून मंजूर करण्यात आली असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या मागणीनुसार नागरसोगा ३३ केव्हीए उपकेंद्रात ५ एमव्हीए चा अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आला असून जून अखेरपर्यंत नागरसोगा उपकेंद्रातून आता अतिरिक्त दाबाने होणार विजपुरवठा होणार आहे. औसा मतदारसंघातील शेतकऱ्यांना उच्च दाबाने व अखंडित विद्युत पुरवठा करण्या बरोबरच रोहित्र वेळेवर दुरुस्त करून देणे, विद्युत उपकेंद्रांची क्षमता वाढ करण्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करणे, मंजूर नवीन उपकेंद्राचे काम तातडीने सुरु करणे आणि फिडर सेपरेशनची कामे प्राधान्याने पूर्ण करणे इत्यादी विषयांवर आमदार अभिमन्यू पवार यांनी लक्षवेधीद्वारे विधानसभा अधिवेशनात सभागृहाचे लक्ष वेधून घेतले होते. ऊर्जा खाते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असल्याने आमदार अभिमन्यू पवारांच्या या मागण्या तातडीने पूर्ण होतील अशी अपेक्षा मतदारसंघातील लोकांना होते. या अपेक्षेप्रमाणेच मतदारसंघातील हे प्रश्न प्राधान्याने मार्गी लागत आहेत.महावितरण च्या ग्राहकांच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी / समस्या संदर्भात काही दिवसापूर्वी औसा तहसील कार्यालयात आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत महावितरणचे मुख्य अधीक्षक अभियंता, वरिष्ठ व कनिष्ठ अभियंता व सर्व औसा विधानसभा मतदारसंघातील महावितरण चे अधिकारी कर्मचारी आणि सर्व गावातील सरपंच यांच्या आढावा बैठकीत यासंदर्भात नागरसोगा येथील प्रमुख ग्रामस्थांनी तक्रार केली होती. त्यासंदर्भात आमदार अभिमन्यू पवार यांनी नागरसोगा सह सर्व ३३ केव्हाही उपकेंद्र च्या तसेच नवीन मंजूर उपकेंद्राच्या कामाचा आढावा घेऊन आरडीएसएस अंतर्गत वाढीव ५ एमव्हीए चे नवीन रोहित्र मंजूर करण्याबाबत सूचना दिलेल्या



होत्या. तसेच विधानसभा अधिवेशनात यासंदर्भात लक्षवेधी उपस्थित करून चर्चाही केली आणि त्यात महावितरणच्या समस्याबाबत मागणी लाऊन धरली त्यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी औसा विधानसभा मतदारसंघातील आरडीएसएस अंतर्गत प्रस्तावित सर्व कामे मंजूर करण्यात आली असून लवकर हाती घेण्याचे आश्वासन दिले होते. या मागणीचा सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. या योजनेंतर्गत फिडर सेपरेशन ची कामे प्रगती पथावर असून माळूंब्रा येथील सब स्टेशन चे कामही सुरु झाले आहे. आमदार अभिमन्यू पवार यांची सातत्याने मागणी व पाठपुरावा त्यानुसार सदरील योजनेत तालुक्यातील सर्व ओव्हर लोड उपकेंद्राची क्षमतावाढ आरडीएसएस योजनेतून मंजूर करण्यात आली असून नागरसोगा ३३ केव्हीए उपकेंद्रात ५ एमव्हीए चा अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आला असून जून अखेरपर्यंत नागरसोगा उपकेंद्रातून आता अतिरिक्त दाबाने होणार विजपुरवठा होणार आहे. सदरील मंजूरीबद्दल आमदार अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत...

# सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांचा रेणा संचालक मंडळाकडून सत्कार

दिलीप नगर :–– नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत लातूर मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचे डॉ. शिवाजी काळगे बहुमताने निवडून आले. या निवडणुकीत सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनात काँग्रेस पक्षाने रणनीती आखली व त्यास यश प्राप्त झाले. याबद्दल सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांचा रेणा कारखाना संचालक मंडळाकडून सत्कार करण्यात आला.लोकसभा निवडणुकीत माजी मंत्री आ. अमित विलासरावजी देशमुख साहेब, लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासरावजी देशमुख साहेब व पक्षातील सर्वांनी अथक परिश्रम घेतले व त्यास मतदारांनी साथ दिली.



सत्कार प्रसंगी माजी आमदार त्र्यंबक भिसे,राज्य साखर संघाचे सदस्य आबासाहेब पाटील, माजी चेअरमन यशवंतराव पाटील,रेणाचे चेअरमन सर्जेराव मोरे,व्हाईस चेअरमन अनंतराव देशमुख, संचालक सर्वश्री धनराज देशमुख,लालासाहेब चव्हाण,अनिल कुटवाड,संजय हरिदास, संग्राम माटेकर, प्रेमनाथ आकणगिरे, चंद्रकांत सूर्यवंशी, प्रवीण पाटील, संभाजी रेड्डी, शहाजीराव हाके, तानाजी कांबळे, सौ वैशालीताई माने, सौ अमृताताई देशमुख, तक्रार निवारण समितीचे सदस्य सतीश पाटील तसेच स्नेहलराव देशमुख, पंडितराव माने, कार्यकारी संचालक बी. व्ही.मोरे व खाते प्रमुख आदींची उपस्थिती होती.

## संपादकीय....

# घराणेदार

केंद्रीय मंत्रिमंडळातील १५ मंत्री 'पुढल्या पिढी'तले आणि ज्या पक्षांशी भाजपने घरोबा केला आहे वा होता त्यापैकीही अनेक पक्ष एका कुटुंबाहाती; हे वास्तव भारतीय राजकीय परिप्रेक्ष्यातून काही काही विषय कायमचे बाद करण्याची गरज आहे. त्यातील एक म्हणजे भ्रष्टाचार. हा मुद्दा केवळ सभासंमेलनांपुरता मांडला जातो आणि प्रत्यक्ष भ्रष्ट कृतींचे प्रमाण कमी होण्याबाबत त्यातून काडीचाही फरक पडत नाही. त्यात अलीकडे एक नवीनच प्रथा सुरू झालेली दिसते. विरोधकांतील भ्रष्टाचारी सत्ताधाऱ्यांच्या पंगतीत येऊन बसला की त्याचे रूपांतर पुण्यात्म्यात होते आणि माध्यमांसह संबंधित राजकारणी या व्यक्तीच्या कथित भ्रष्टाचाराच्या मुद्द्यास आनंदाने बगल देतात. या निवडणुकीत या नवीन गुणधर्माचे प्रत्यंतर पुन्हा एकदा आले. म्हणजे ७० हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप होऊन काही दिवस उलटायच्या आत साक्षात पंतप्रधानांनी ज्यांच्यावर आरोप केला ते अजितदादा पवार पंतप्रधानांच्या पक्षात मोक्याच्या जागी येऊन बसले. अशोक चव्हाण, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, कृपाशंकर सिंह आदी नामांकित व्यक्तिमत्त्वे सदाचारी, नैतिकवादी भाजपच्या दृष्टीने आधी भ्रष्ट होती. या सर्वांवरून भ्रष्टाचाराचे बालंट कायमचे दूर व्हावे या उदात्त हेतूनेच बहुधा भाजपने त्यांना गळामिठीत घेतले असणार. भारतास भ्रष्टाचारमुक्त करणे म्हणजे भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्यांस स्वपक्षात घेऊन त्यांस त्या आरोपांपासून मुक्त करणे असा त्याचा अर्थ भाजपस अभिप्रेत असल्याचे समग्र भारतवर्षास एव्हाना लक्षात आले असणार. सबब यापुढे भ्रष्टाचार या विषयास निवडणूक वा राजकीय आरोप–प्रत्यारोपांतून वगळणे आवश्यक. उगाच क्षुल्लक मुद्द्यावर वेळ घालवण्यात काय हशील! तसेच भ्रष्टाचारापाठोपाठ कायमची फुली मारून टाकणे आवश्यक असा विषय म्हणजे राजकारणातील घराणेशाही. भ्रष्टाचाराइतकाच हा विषयही केंद्रीय सत्ताधारी भाजपच्या अत्यंत जिव्हाळ्याचा. या मुद्द्यावर जितकी पोटतिडीक भाजपने आतापर्यंत दाखवलेली आहे तितकी घराणेशून्यांसही कधी आतापर्यंत दाखवता आली नसेल. परंतु कालौघात भ्रष्टाचार या मुद्द्याप्रमाणे घराणेशाही हा विषयही राजकारणाच्या विषयपत्रिकेवरून कायमचा कटाप व्हायला हवा.

याचे कारण नुकत्याच स्थापन झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळात एखाददुसरा, वा तिसरा नव्हे तर तब्बल किमान १५ मंत्री हे 'राज'घराण्यातील आहेत. ही यादी पाहा. पीयूष गोयल, एच. डी. कुमारस्वामी, रामनाथ ठाकूर, जयंत चौधरी, चिराग पासवान, राव इंदरजित सिंग, किरण राम मोहन नायडू, धर्मेंद्र प्रधान, अनुप्रिया पटेल, रक्षा खडसे, कमलेश पासवान, शंतनू ठाकूर, किरेन रिजीजू आदी किती उदाहरणे द्यावीत! जोडीला तूर्त भाजपवासी असलेले ज्योतिरादित्य शिंदे आणि जतीन प्रसाद वगैरे मूळ काँग्रेसी घराणेवाले आहेतच. याचा अर्थ या सर्वांचे वैयक्तिक कर्तृत्व काहीच नाही, असा अजिबात नाही. पण इतरांच्या तुलनेत वाडवडिलांमुळे या मान्यवरांस आपले कथित कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी तुलनेने सहज आणि लवकरही मिळाली. भाजपचे शीर्षस्थ नेते नेहमी स्वकर्तृत्व, सामान्य पार्श्वभूमीमुळे पूर्वार्धात करावा लागलेला संघर्ष इत्यादी इत्यादी मुद्दे भावनेचे कढ काढत सांगत असतात. पण कॅबिनेट मंत्र्यांतील जवळपास निम्मे मंत्री पूर्वसुरींमुळे या स्थानी आहेत. हे झाले विद्यमान कॅबिनेट मंत्र्यांचे वास्तव. त्याखेरीज राजनाथ सिंग यांच्या सुपुत्राचे लोकप्रतिनिधी असणे वा वरिष्ठ नोकरशहापुत्रास मोक्याच्या मतदारसंघात स्थान मिळणे किंवा समग्र भारतवर्ष ज्याच्या क्रिकेट– व्यवस्थापननैपुण्याने अचंबित झाला त्या व्यक्तीने साक्षात गृहमंत्र्यांच्याच पोटी जन्म घेतलेला असणे इत्यादी घटकांची मोजदाद न केलेलीच बरी. याचा अर्थ घराणेशाही या मुद्द्यावर सर्व पक्ष सारखेच. एकास झाकावा आणि दुसऱ्यास काढावा अशी स्थिती.

तथापि असा युक्तिवाद भाजप नेत्यांस मान्य नसतो. त्यांचे म्हणणे घराणेशाही म्हणजे ज्या पक्षांचे नियंत्रण एखाद्या कुटुंबाहाती असते, असे पक्ष. भाजपच्या मते ही घराणेशाही निंदनीय आहे आणि तो पक्ष अशा कौटुंबिक मालमत्ता असलेल्या पक्षांस कधीही जवळ करत नाही. या अशा पक्षांचा लोकशाहीवर विश्वास नसतो, असेही भाजपस वाटते. ते योग्यच. पण मग 'तेलुगु देसम' हा पक्ष कसा आहे? चंद्राबाबू नायडू यांच्या हाती पक्षाची सूत्रे आणि त्यांचे सुपुत्र नारा लोकेश हे कोण? रामविलास पासवान आणि चिराग पासवान यांच्या पक्षाचे काय? या पक्षातील अन्य तेजस्वी नेत्यांची नावे भाजप नेते तरी सांगू शकतील काय? घराणेशाहीसाठी भाजप तमिळनाडूतील द्रमुक वा महाराष्ट्रातील राष्ट्रवादी, उद्धव ठाकरे यांची शिवसेना इत्यादींबाबत नाके मुरडतो. पण या सगळ्यांपेक्षा तेलुगु देसम वेगळा कसा? आणि मुख्य म्हणजे ज्या शिवसेनेस भाजपने दत्तक घेतल्यासारखे आहे त्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे काय? या पक्षाच्या आणि मुख्यमंत्री शिंदे सुपुत्र श्रीकांत यांच्या प्रचारासाठी पंतप्रधानांनी कल्याण परिसरात पायधूळ झाडली, ती का? महाराष्ट्रात सध्या भाजपस प्यारा असलेला दुसरा पक्ष म्हणजे अजितदादा पवार यांचा राष्ट्रवादी. तो पक्ष घराणेशाहीपासून दूर आहे याचा साक्षात्कार भाजपस कोणत्या कोनातून त्याकडे पाहिल्यामुळे झाला? 'अपना दल' पक्षाचे काय? हरयाणात अलीकडेपर्यंत चौताला यांच्या कौटुंबिक पक्षाशी भाजपचे सौहार्दाचे संबंध होते आणि उभयतांत सत्ता स्थापनेचे देवाणघेवाणीचे व्यवहारही होते. तेव्हा अशा सत्तासोबतींचा मुद्दा जेव्हा येतो तेव्हा भाजपच काय अन्य कोणीही कधीही घराणेशाहीस आक्षेप घेतल्याचे दिसत नाही.

असे अनेक दाखले देता येतील. त्या सर्वांवरून भ्रष्टाचाराप्रमाणे घराणेशाही या मुद्द्यावरही आपण आणि आपले राजकीय पक्ष किती दांभिक आहोत याचे प्रत्यंतर येईल. हा दुटप्पीपणा हास्यास्पद म्हणायचा. वास्तविक ज्या समाजजीवनात 'गवयाचे पोरही सुरात रडते' अशा अर्थाचा वाक्प्रचार सर्रास वास्तवात आलेला असतो, त्या समाजात खरे तर घराणेशाही हा मुद्दाच असता नये. आता तर ही घराणेशाही आणखी एका बाबतीत नव्या उंचीवर आपल्याकडे गेलेली आढळेल. ही बाब म्हणजे बाबाबापूंची. परमेश्वराची आराधना आणि साधना सातत्याने केल्यामुळे देवगुणांचा स्पर्श होऊन आपल्या अंगी काही प्रमाणात का असेना देवत्व आल्याचे असे कोणाकोणास वाटू शकते. कोणी काय वाटून घ्यावे हा ज्याचा त्याचा प्रश्न. तथापि असे अन्य काहींसही वाटू लागते आणि पाहता पाहता अशा व्यक्तीचे रूपांतर सिद्ध साधकात होऊन अशी व्यक्ती अनेकांस वंदनीय वाटू शकते. तेही एकवेळ ठीक. तथापि या अशा देवत्वाचा स्पर्श झालेल्या व्यक्तीच्या देवत्वाचा वसा पुढच्या पिढीकडेही कसा काय संक्रमित होतो, हा सामान्य जनांस न कळलेला प्रश्न. त्यामुळे या व्यक्तीचा सुपुत्र वा सुपुत्रीही वंदनीय ठरून भाविकांचे श्रद्धास्थान ठरते. सबब ज्या समाजात हे असे देवत्वही एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे संक्रमित होत असेल तर अशा समाजात घराणेशाहीविरोधात इतका कंठशोष करण्याचे खरे तर काही कारण नाही.

# मान्सूनचे शुभागमन!



नैऋत्य मोसमी वा–यांनी महाराष्ट्रात दमदार हजेरी लावली आहे. रविवारी पुणे, मुंबईसह मराठवाड्यात मान्सूनचे दमदार आगमन झाले. केरळमध्ये मान्सून ३० मे रोजी दाखल झाल्यानंतर ६ जून रोजी गोव्याचा उर्वरित भाग कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणासह महाराष्ट्रात दाखल झाला होता. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली, सोलापूरमध्ये मान्सूनने आपले अस्तित्व दाखवले. रविवारी राज्याच्या विविध भागात पाऊस झाला. १० ते १३ जून दरम्यान काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वा–यासह मुसळधार पाऊस तसेच मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाड्यात काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याचा इशारा देण्यात आला आहे.

मराठवाड्यात मान्सूनचे दमदार आगमन झाले असून रविवारी विभागातील ४५ मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली. यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ३७ मंडळांचा समावेश आहे. गत दहा दिवसांत ५१ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाल्याने शेतक–यांनी पेरणीची कामे सुरू केली आहेत. गत काही दिवसांपासून मराठवाड्यात पावसाने नियमित हजेरी लावली आहे. सोमवारी लातूर शहरासह जिल्ह्यात कोरडे वातावरण होते परंतु सायंकाळी साडेसहानंतर पाऊस सुरू झाला. तो रात्री उशिरापर्यंत धो–धो बरसला. लातूरसह निलंगा, औसा, शिरूर अनंतपाळ, जळकोट, चाकूर, अहमदपूर, उदगीर तालुक्यात पावसाने जोरदार हजेरी लावली. परभणी जिल्ह्यातही अनेक ठिकाणी ढगफुटीसदृश्य पाऊस झाला. त्यामुळे शेतशिवारात पाणीच पाणी झाले. ओढे, नाले तुडुंब भरून वाहू लागले. मानोलीत ओढ्यात एक महिला वाहून गेली.

मानवत तालुक्यातील मानोली शिवारात सोमवारी दुपारी ४ च्या सुमारास ढगफुटी झाली. त्यामुळे आलेल्या पुरात दोन महिला वाहून गेल्या. पैकी एक महिला झाडाला अडकल्याने वाचली तर दुस–या महिलेचा उशिरापर्यंत शोध लागला नव्हता. लातूर जिल्ह्यात रोजच पावसाचे बरसणे सुरू आहे. दिवसभर उन्हाची तीव्रता असते. सायंकाळी मात्र आकाशात ढग दाटून येतात आणि बघता बघता ढगाला कळ लागते. सोमवारीही रात्रभर पाऊस सुरू होता. जिल्ह्यात सर्वत्र जोरदार पाऊस झाल्याने निलंगा, औसा तालुक्यात ओढे, नाले तुडुंब भरून वाहू लागले. निलंगा तालुक्यात माकणी थोर आणि जळकोट तालुक्यात घोणसी येथे वीज पडून दोन म्हशी दगावल्या. परभणी जिल्ह्यातही जोरदार पाऊस झाला. नांदेड जिल्ह्यात ढगाळ वातावरण होते तर काही भागात पाऊस झाला. बीड, हिंगोलीतही ब–याच भागात पाऊस झाला. धाराशिव जिल्ह्यात काही भागात रिमझिम पाऊस झाला. रात्री ढगाळ वातावरण होते. 'मिरगा'चा चांगला पाऊस झाल्याने शेतक–यांची पेरणीसाठी लगबग सुरू झाली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात मान्सूनचे आगमन झाले असून 'पावशा'चा पेर्ते व्हा.. पेर्ते व्हा असा संदेश मिळाल्याने शेतक–यांनी पेरणीची तयारी केली आहे.

काही भागात पेरण्यांना सुरुवात झाली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी पावशाचा संकेत लगेच ओळखतो. बदलत्या काळात तंत्रज्ञानाच्या साह्याने विविध संस्थांनी हवामानाचे किंवा पावसाचे अंदाज वर्तवले तरी त्यावर फारसा विश्वास न ठेवता सर्वसामान्य शेतकरी जुन्या पारंपरिक संकेतावरच अधिक विश्वास ठेवतो. निसर्गात होणा–या बदलांची सर्वप्रथम जाणीव प्राणी–पक्ष्यांना होते. त्या जाणिवेतूनच प्राणी–पक्ष्यांच्या हालचाली व स्वरात बदल होत असतात. या बदलांच्या संकेतावरून शेतकरीवर्ग मान्सूनचे आगमन कधी होईल याचा अंदाज बांधतो. त्यानुसार मृग नक्षत्रात शेतीची कामे वेग घेऊ लागतात. मृग नक्षत्रात लाल रंगाचे मखमली नाजूक किडे शेत शिवारात वावरू लागल्यावर पाऊस हमखास बरसणार अशी अटकळ शेतकरी बांधतो. अर्थात हे पारंपरिक अंदाज आहेत. अलिकडे वेधशाळांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार त्या–त्या तारखेला पावसाचे आगमन होत आहे.

सर्वसाधारपणे ७ जूनला सर्वदूर मृग नक्षत्राचा पाऊस होतो. गतवर्षी अंदाज वर्तवूनही ७ जूनला पाऊस बरसला नव्हता. नंतर काही दिवसांनी जोरदार बरसला होता मात्र, त्यानंतर सुमारे दोन आठवडे त्याने दडी मारली होती. यंदा मात्र पाऊस वेळेवर येईल असा अंदाज वेधशाळांनी वर्तवला होता आणि त्याप्रमाणे ३–४ जूनपासूनच महाराष्ट्रात काही भागात पावसाचे आगमन झाले. पुणे, कोल्हापूर, सिंधुदुर्ग भागात पहिल्याच पावसाने लोकांची दाणादाण उडवली. पुण्यात केवळ दोन तासांत ९० मि.मी. पाऊस झाला. कोल्हापूरमध्येही वादळी वा–यासह पाऊस झाला. वेळेआधीच दाखल झालेल्या पावसामुळे यंदाचा संपूर्ण पावसाळा जोरदार असेल असा अंदाज बांधण्यास हरकत नाही. सुरुवातीच्या पावसानेच लोकांची दाणादाण उडत असेल तर प्रत्यक्ष आषाढातल्या पावसात काय परिस्थिती उद्भवेल याचाही अंदाज येऊ शकतो. वेळेआधी दाखल झालेल्या वरुणराजाचे स्वागत करताना लोकांचे अनाठायी नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. महिनाभरापूर्वी राज्यात तापमान प्रचंड वाढले होते.

जवळपास सर्व धरणे कोरडीठाक पडली होती. मुंबईसारख्या महानगराला पाणीपुरवठा करणा–या तलावांमध्ये जेमतेम महिनाभर पुरेल इतकेच पाणी शिल्लक होते. ग्रामीण भागातील पाणीटंचाईबद्दल न बोललेलेच बरे? या भागात पाणी मिळवण्यासाठी प्रचंड परिश्रम घ्यावे लागत आहेत. आता योग्य मुहूर्तावर पावसाचे आगमन झाल्याने पिण्याच्या पाण्याची टंचाई काही प्रमाणात दूर होईल. शिवाय जनावरांच्या चारा–पाण्याचा प्रश्नही ब–यापैकी मार्गी लागू शकेल. पावसाचे हे शुभागमन संपूर्ण वर्षासाठीसुद्धा शुभ संकेत देणारे ठरू शकेल. पुरेशा प्रमाणात पाऊस होणार असेल तर योग्य पद्धतीने पाण्याचा वापर करण्याची तयारी सरकारी यंत्रणांनी ठेवली पाहिजे. म्हणजेच पाऊस कमी झाला तरी संकटाचा सामना करावा लागतो आणि पाऊस जास्त झाला तरी संकटाचा सामना करावा लागतो! संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था सांभाळणारा मान्सून यंदा वेळेआधीच दाखल झाला आहे म्हणून 'हॅप्पी मान्सून' असे म्हणूया!

# म्हणून मनुस्मृति जाळली

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक नाव नसून महान विचार आहे, विषमता, माणसा माणसात भेद, अंधश्रद्धा, रूढ़ी–परंपरा यांसारख्या महाघातक व्यवस्थाना मुळापासून उपटून समानतेची बंधूभावाची माणूसकीची नवीन बीज समाजात पेरणारे देशहीतकारक, क्रांतिकारक, अर्थतज्ञ समाजसुधारक, बुध्दीसम्राट, बेरीस्टर, घटनेचे शिल्पकार म्हणजेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. बाबासाहेबां जवळ एकूण ३२ पदव्या होत्या, जातीयतेचे भेदभावांचे अनंत चटके सहन करून हार न स्वीकारता, न खचता अविरतपणे बाबासाहेबांनी विद्याग्रहण केली. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात प्रवेश घेतल्यावर अठरा–अठरा तास अभ्यासात स्व:ताला झोकून घेतले पोटाला भुकेची ठिणगी पडली असतानाही विद्याग्रहनाची प्रक्रिया सतत सातत्यपूर्ण अविरतपणे चालू ठेवली, विश्वविद्यालयातून १९२४ मध्ये डॉक्टर ऑफ फिलॉसफी ही अत्युच्च व मौल्यवान पदवी त्यांना देण्यात आली. अमेरिकेत शिकत असताना अमेरीकेतील समानवादी वातावरणाचा प्रभाव त्यांच्यावर झाला भारतात देखील समता–बंधूता–समानता असावी यातच देशाच हीत आहे हे आंबेडकरांना उमजल होत; देशात भेदभाव, उच्च नीचता, रूढ़ी परंपरा, स्त्री पुरुष विषमता निर्माण करणा–या सवर्णांच्या कायद्याच्या पुस्तकाच म्हणजेच मनुस्मृतिचे २५ डिसेंबर १९२७ साली रायगडाच्या पायथ्याशी दहन केल. मनुस्मृतीत अस्पृश्य आणि समस्त भारतीय स्त्रियांना सर्वच अधिकारांपासून दूर ठेवल होत एका विशिष्ट वर्गाकरिता अधिकार हक्क होते, स्त्रीही कुठल्याही समाजाची असो तीला आणी दलित समाजाला शिक्षण व इतर मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आल होत, मनुस्मृति प्रमाणे स्त्री ही पुरूषांना भ्रष्ट करते म्हणून ज्ञानी व्यक्तिने स्त्री पासून सावध राहिले पाहिजे, स्त्री ही गुलाम आहे तीला कोणतेही स्वतंत्र देवू नये लहान असताना वडीलांच्या धाकात, लग्नानंतर पतीच्या बंधनात, पतीनंतर मुल देखभाल करतील परंतु स्त्री कधी आझाद नसेल असा सामजघातक कायदा मनुने लिहिला, स्त्रीला याहूनीही वाईट वागणूक दिली गेली आहे ते इथे शब्दात लिहीन फार चुकिच ठरेल, स्त्रिला मनुने परावलंबी केल होत, स्त्रीचा फक्त भोगवस्तू म्ह्णून वापर होऊ लागला होता देश स्वतंत्र्य होण्याअगोदर स्त्रियांची स्थिति गुलामापेक्षा ही खूप वाईट होती. दलित समाजाची अवस्था त्याहुन हालाखीची होती, दलितांना गावाबाहेर वास्तव कराव लागत होत, गळ्यात मडक पाठीला झाडू बांधून गावभर फिराव लागत होत, मंदिरे सार्वजनिक पाणवठ्यावर जाण्याची दलित समाजास मुभा नव्हती, एका विशिष्ट वर्गाने फक्त सर्वच अधिकार, हक्क आपल्या ताब्यात घ्यावी व इतर वर्गांनी या सवर्णांची सेवा करावी, स्त्रीया आणि दलित समाजास मात्र हीनदिन वागणूक द्यावी शिक्षण व इतर अधिकार स्वता:पाशी ठेवावेत म्हणजे इतर समाज घटक शिक्षणाने दुर्बल राहिले की ते अज्ञानी, अशिक्षित असल्याने गुलाम बनून हव ते करता येईल, सर्वच अधिकार एका विशिष्ट वर्गाला आहेत अन्य कुणाला नाही तुम्ही फक्त आमची सेवा करावी असे उच्च वर्गीय समाजाने निर्बंध लादले होते. मनुष्य असुनही मनुष्या सारख जगण्याचा अधिकार नाही जनावरांपेक्षा वाईट वागणूक का ? हा अन्याय कसला ? हा नियम जो माणसा माणसात भेद करतो आपल्या समाजाचा घटक असलेल्या एका गरीब, साध्या–भोळ्या, अज्ञानी बांधवांवर हुकूमत गाजवतो हा सारा कारभार मनुस्मृति प्रमाणे चालल्या कारणाने बाबासाहेबांनी मनुस्मृतिच दहन केल आणि इथून एक नवी क्रांती उदयास आली डॉ. आंबेडकरांनी संविधानरुपी समस्त भारतीय महीलांना शिक्षणाचा, अन्याया विरुद्ध लढण्याचा समानतेचा अधिकार दिला. स्त्रीला गुलामीच्या पिंज–यातून आझाद केल, आकाशी ऊंच झेपवण्यास विविध हक्क अधिकार दिले, महिलांच्या हक्कांकरिता हिंदू कोड बिल चार वर्षे एक महीना सव्वीस दिवस अथक परिश्रम करून लिहल होत परंतू संविधान सभेत मंजूर होवू शकल नाही त्यातली घटस्फोट, द्विभार्या प्रतिबंध या सारखी कलमे विरोधकांनी विवाद्य बनवली, २० ऑक्टोबर १९५१ रोजी बबासाहेबांनी मात्र विरोधकांना जोरदार मार्मिक उत्तर दिले. आज सुधारणेच्या युगात स्त्रियांना समान हक्क द्यायला तुम्ही नकार का देता ? स्त्रियांना ईस्टेटीत वाटा देण्यास मनुने नाकार दिला नाही मग तुम्ही का देता? असा सवाल त्यांनी सनातन्यांना केला बाबासाहेब स्त्रीयांसाठी एकटेच लढत होते शेवटी सत्र संपले हिंदू कोड बिलाची फक्त ४ कलमे मंजूर झाली बाबासाहेब अत्यंत दु:खी निराश झाले २७ मे १९५१ रोजी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला, एवढा मोठा त्याग बाबासाहेबांनी स्त्रियांच्या हक्कासाठी केला! म्हणून प्रत्येक भारतीय नागरीकाने आणि प्रत्येक भारतीय स्त्रीने बाबासाहेबांचा आदर केलाच पाहीजे. आज स्पर्धेच्या युगात महिला सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहे याच श्रेय बाबासाहेबांना जात राष्ट्रनिर्मात्या आंबेडकरांनी दलीतांना आणि इतर वर्गांना आरक्षण दील त्याच कारण ही जाणूण घेण अत्यंत गरजेच ठरेल हजारो वर्षापासून या समाजाला सर्व अधिकार हक्का पासून वंचित ठेवल्या कारणाने आर्थिकदृष्ट्या गरिब सामाजिक बाबतीत गुलाम शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्याने हा सामाज इतर समाजा सोबत येण्यास प्रवृत होइल या सर्वच व्यवस्थेमुळे देश ही सर्व क्षेत्रात सर्वोत्तम उच्चांक ठरेल असे बाबासाहेबांचे धोरण होते, रुढि परंपरा, घातक जातपात, उच्च कमीपणा, विषमता, स्त्री पुरुष विषमता या सर्वच समाजास घातक परंपरांना नष्ट करून प्रज्ञा–समता–बंधूभाव देशात रूजवीला सर्वांना समतेच्या मार्गावर नेवून ठेवणारा भारत देश निर्माण केला.

***********

गौतम सांगेलकर
सिंधुदुर्ग
९४०४०८५२५१

# सर्वांना क्रांतिकारी सप्रेम जयभीम...



हल्लीच्या राजकारणात आंबेडकराईट पक्ष मग त्यात बसपा – वंचित पासून ते सर्वच रिपब्लिकन गटा–तटात विखुरलेल्या छोटे मोठ्या पक्ष आणि संघटनांनी एकत्र येऊन एक मताने एक विचाराने मिशन २०२४ चा निर्णय घेतला असता तर आज चालुन आलेल्या नामी संधीचा फायदा नक्कीच आपल्या वंचित – बहुजन समाजाला झाला असता, आपले बरेच खासदार निवडून आले आसते आणि या जातीवादी नमो सरकारला चारो मुंड्या चित्त केले आस्ते. परंतू तसे झाले नाही उलट आपलीच नाचकी झाली आणि म्हणून तसे चालु वर्तमानकाळात आणि भविष्यकाळात आंबेडकरी चळवळीच्या राजकारणात पुन्हा अशी चुक होणार नाही याची अता तरी आपल्या नेत्यांनी – कार्यकर्त्यांनी खबरदारी घेऊन क्रांतीकारी एक पाऊल पुढे टाकुन अगामी काळात होणारी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक हि अवघ्या सहा महिन्यांवर येऊ ठेपली आहे आणि म्हणून या संदर्भात अता तरी अपल्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी चिंतन – मंथन करावे आणि ऐक्याचे क्रांतीकारी एक पाऊल पुढेच टाकावे, पहले अपनी काबीज करो गल्ली तबी तो मिलेगा दिल्ली..!
मै बडा की तु बडा इसमे आपना समय बरबाद मत करो, अश्या वागण्याने आणि एकमेकांचा द्वेष करण्याने व आपल्या अहंकारी न्यूनगंडामुळे आपल्या पदरात काहीच पडणार नाही. आपले दुश्मन आंबेडकराईट पक्षांना सत्तेपासून कोसो दुर ठेवण्यासाठी नको ते डावपेच खेळतात, यावेळी तर संविधान धोक्यात आहे, लोकशाई धोक्यात आली आहे आणि म्हणून आम्हीच संविधानाचे रक्षक आहोत आसे आमच्या भोळाभाबड्या समाजाला भावनिक केले आणि आमच्यातिलच काही गद्दारांना हताशी धरून व निळा झेंडा सोबत घेऊन प्रचारयंत्रणा राबवली, संविधानात्मक लोकशाई धोक्यात आली आहे आसे आमच्या डोक्यात बिंबवले व भितीचे वातावरण तयार केले आणि त्याला सर्व वंचित – बहुजन, आंबेडकरी समाज बळी पडला. अशा प्रकारे मस्तावलेल्या राजकारण्यांनी आपल्या विरोधात रातोरात क्षडयंत्र रचून वंचित बहुजन समाजाला राजकारणात झिरो केले, व आपले आदर्श युगपुरुष : फुले, शाहु, आंबेडकर या विचारांची चळवळ संपवली हे आपन सारे उघड्या डोळ्यांनी पहात आहोत हे आसेच आजुन कित्येक वर्ष चालणार की, सत्ता परिवर्तन घडवून अनणार ? या संदर्भात चिंतन – मंथन होणे ही काळाची गरज आहे आणि म्हणून माझ्या समाज बांधवांनो... अता तरी यांचे मनसुबे लक्षात घ्या आणि सत्ता परिवर्तनाचे चक्र गतीमान करा.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात जे इतिहास विसरतात ते इतिहास कधीच घडऊ शकत नाहीत..! – आणि म्हणून माझ्या वंचित – बहुजन समाज बांधवांनो...आठवा जरा तो मागील इतिहास १९९८ साली ऐक्य झाले तेंव्हा आपले चार खासदार निवडून आले होते. त्यात आपलाच १००% विजय झाला होता, असा आपला क्रांतीकारी जाज्वल्य इतिहास आहे याची पुनरावृत्ती आपण कराल आणि महाराष्ट्र विधानसभेवर निळा झेंडा फडकवाल हिच एक सर्व सामान्य भिम सैनिकांची अपेक्षा. वंचित बहुजन सारे एक होऊ अता तरी महाराष्ट्राची सत्ता अपल्या हत्ती घेऊ..! हाच एकमेव आपन साऱ्यांनी निर्धार करून अधुनिक भारताचे संविधान निर्माते प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न प्रबुद्ध भारत अशोक सम्राटचा भारत साकार करूयात हिच एक तळमळ आणि कळकळीची नंम्र विनंती. जय भारत ! जय संविधान !!
..

के. एच. हनवते (पत्रकार) स्वाभिमानी भिम सैनिक महावृत्त दैनिक..! ९९६७७१६४४३


# स्वयंपाकासाठी कोणती भांडी चांगली? स्वयंपाकाची सर्वात चांगली पद्धत कोणती? वाचा नव्या मार्गदर्शक सूचना

चुलीवरच्या आमटीची सर आता गॅसवर केलेल्या आमटीला नाही... कुकरमधला भात आणि पातेल्यात शिजवलेला भात अगदी वेगळा लागतो... मायक्रोव्हेवमध्ये केलेल्या पदार्थाला आजिबात चव येत नाही... अमूक पद्धतीने केलेले पदार्थच चांगले, अशा पद्धतीनं शिजवलं की त्यातलं सत्व निघून जातं... अशी वाक्यं आपल्या घरोघरी ऐकायला मिळतात. अनेक घरांमध्ये पदार्थ शिजवण्याचे, गरम करण्याचे, उकळण्याचे सेवन करण्याचे अनेक नियम पाळले जातात.बहुतेकवेळा अन्न शिजवण्याच्या पारंपरिक पद्धती योग्य मानल्या जातात. आधुनिक, विजेचा वापर असलेली मायक्रोव्हेव ओव्हन किंवा एअर फ्रायरसारखी उपकरणं अन्नपदार्थातीलं पोषणमूल्यं वाया घालवतात, तो स्वयंपाक चांगला नसतो असे समज–अपसमज असतात. मात्र इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आयसीएमआर) आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूट्रिशनने (एनआयएन) यावर्षी सादर केलेल्या नव्या मार्गदर्शक सूचनांमध्ये दिलेल्या माहितीमुळे स्वयंपाकाचे प्रकार आणि स्वयंपाकाची भांडी याबद्दलचे अनेक रुढ समज आता बदलावे लागणार आहेत. या अहवालात भारतीय स्त्री–पुरुषांना दररोज किती आहार लागतो, किती पोषकघटकांची गरज आहे, स्तनपान देणाऱ्या महिला, लहान मुलांच्या आहारात काय असावं इथपासून स्वयंपाकाच्या उपकरणांपर्यंत आहारशास्त्रीय माहिती दिली आहे. या नव्याने देण्यात आलेल्या सुचनांना 'डाएटरी गाईडलाइन्स फॉर इंडियन्स' म्हणजेच 'भारतीयांसाठी आहार मार्गदर्शक सुचना' असंच नाव आहे. सुरुवातीला आपण स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धती आणि स्वयंपाकाची भांडी याबद्दल या अहवालात काय म्हटलंय हे पाहू, कोणती भांडी चांगली? पोषणघटकांचं काय?बऱ्याचवेळा स्वयंपाक कोणत्या भांड्यात करायचा, आपण वापरत असलेली भांडी योग्य आहेत का, त्याची काळजी कशी घ्यायची, त्यात कोणती विपरित रासायनिक अभिक्रिया तर होत नसेल ना अशी शंका येत राहाते. तसेच स्वयंपाक करतानाया भांड्यांमुळे त्यातल्या पोषणद्रव्यांचं नुकसान तर होत नाही ना? अशीही धाकधूक वाटत राहाते. आयसीएमआर आणि एनआयएनच्या या नव्या सुचनांमध्ये मातीची भांडी, धातूची, स्टेनलेस स्टिलची, नॉनस्टिक आणि ग्रॅनाइटच्या दगडाच्या भांड्याची माहिती दिली आहे.या सुचनावलीत मातीची भांडी स्वयंपाकासाठी सुरक्षित आणि कमी तेलात स्वयंपाक करण्यासाठी चांगली



असं सुचवलं आहे. या भांड्यांमध्ये उष्णता सर्व पदार्थात जाते आणि पोषणमूल्यं टिकून राहातात असं म्हटलंय. लोणची, चटण्या, सांबार, सॉससारखे पदार्थ अल्युमिनियम, लोखंड, काशाच्या आणि तांब्याच्या भांड्यात ठेवू नयेत, असं यात म्हटलं आहे.स्टीलच्या भांड्यात पदार्थांवर फारसा परिणाम होऊन त्यांचा विपरित परिणाम दिसत नसल्याचंही नमूद करण्यात आलं आहे.टेफ्लॉनचा थर असलेल्या नॉनस्टिक पॅनला जर १७० अंश सेल्सियसपेक्षा जास्त गरम केलं तर ते धोकादायक आहे असं या मार्गदर्शक सुचना तयार करणारे तज्ज्ञ सांगतात.हे पॅन रिकामेच आचेवर दीर्घकाळ ठेवले तर हा परिणाम होऊ शकतो. अशा स्थितीत हा थर विषारी वाफा निर्माण करू शकतो.नॉनस्टिक भांडी वापरताना ती स्वच्छ करण्याची आणि वापरण्याची जी सुचनावली असते तिचं पालन केलंच पाहिजे आणि जर या भांड्यांवरचा थर निघून गेला तर ती वापरू नयेत असं या अहवालात म्हटलं आहे. आयसीएमआर–एनआयएनच्या संचालिका डॉ. हेमलता आर याबद्दल म्हणाल्या, नॉनस्टिक भांडी सहज उपलब्ध असल्यामुळे आणि ती लोकप्रिय असल्यामुळे लोकांना घ्यावीशी वाटतात, मात्र अतीगरम केल्यामुळे त्याच्यावरील कोटिंगमध्ये असणारी रसायनं बाहेर पडतात, ती आपल्या अन्नात जातात आणि पर्यायानं शरीरात जातात. हे घातक ठरतं. त्यामुळे नॉनस्टिकचा वापर ठराविक मर्यादेत करावा. ती वापरण्याच्या सुचना पाळाव्यात. ही भांडी घासण्यासाठीही विशिष्ट पद्धत असते. त्यानुसार ती वापरावीत. जुनी झालेली, कोटिंग गेलेली नॉन स्टिक भांडी आजिबात वापरू नयेत. ग्रॅनाइटच्या दगडाची भांडी आता कमी वजनातही मिळू लागली आहेत. या भांड्यात कमी वेळात आणि कमी ऊर्जेत स्वयंपाक होतो.तसेच ही भांडी उष्णता चांगल्या प्रकारे धारण करुन ठेवतात आणि आच बंद केली तरी बराच काळ ती उष्णता टिकून राहाते. जर या भांड्यांना टेफ्लॉनचं कोटिंग नसेल तर ती वापरण्यास सुरक्षित मानली जातात. मायक्रोव्हेव आणि एअर फ्रायर वापरत असाल तर..आयसीएमआर आणि एनआयएनच्या या मार्गदर्शक सुचनांमध्ये पदार्थ झाकून किंवा न झाकता शिजवणे, उकडणे, कुकरमध्ये शिजवणे, वाफवणे, तळणे, कमी तेलात तळणे, जराशा तेलात परतवणे, मायक्रोव्हेवमध्ये शिजवणे, भाजणे, मंद आचेवर शिजवणे, बार्बेक्यू, ग्रिल करणे तसेच एअर फ्रायिंग या प्रकारांची माहिती दिली आहे. प्रत्येक प्रकाराचे फायदे आणि संभाव्य तोटे याबद्दलही त्यात माहिती आहे.उदाहरण घ्यायचं झालं तर तळण्याचं उदाहरण घेऊ. या सुचनांमधील माहितीनुसार, तळण्याच्या प्रक्रियेत पोषणमुल्यांत बदल होता. पाण्यात विरघळणाऱ्या जीवनसत्वांचा म्हणजे क जीवनसत्वासारख्या जीवनसत्वाचा नाश होऊ शकतो. तसेच या तळण्याच्या प्रक्रियेत अतीऑक्सिडाइज्ड घटक तयार होऊन विषद्रव्यं म्हणजे टॉक्सिक प्रोडक्टस् सारखे घटक तयार होऊ शकतात.सर्वात महत्त्वाचे म्हणजे अती तेल आणि मेद (फॅट)च्या वापरामुळे हृदयरोग, पक्षाघात, मधुमेह होण्याची शक्यता वाढते.तसेच पोटाभवती मेदाचे थर साचण्यासाठी, कोलेस्ट्रॉल, ट्रायग्लिसिराइडची पातळी असंतुलित होण्यासही कारण ठरते. तळणासाठी त्याच त्याच तेलाचा वापरही टाळला पाहिजे असं हा अहवाल सांगतो.अशाप्रकारे माहिती दिली असली तरी मायक्रोव्हेव ओव्हनमधील स्वयंपाकाबद्दल हा अहवाल एक नवी आणि आपल्या आजवरच्या कल्पनांना धक्का देणारी माहिती देतो.मायक्रोव्हेव कुकिंगमध्ये आणि पारंपारिक स्वयंपाकामध्ये पोषणघटकांचा विचार करता अल्पसाच फरक आहे असं यातील माहिती सांगते. पोषणमुल्यांना कमीतकमी धक्का लागत अन्न शिजण्याच्या प्रकारांमध्ये मायक्रोव्हेव कुकिंग आहे असंही यात म्हटलं आहे.मायक्रोव्हेव अत्यंत कमी पाण्यात अन्न शिजवतो आणि पदार्थ आतून बाहेरच्या दिशेने गरम करतो. यामध्ये पोषणघटक वाहून जाण्याची प्रक्रिया होत नसल्यामुळे इतर स्वयंपाकपद्धतींपेक्षा यामध्ये जीवनसत्वं आणि खनिजं जास्त प्रमाणात टिकून राहातात.तसेच मायक्रोव्हेव अत्यंत कमी काळात शिजवत असल्यामुळे क जीवनसत्व आणि जे घटक अती गरम केल्यावर नष्ट होतात असे घटकही टिकून राहातात. यामध्ये प्रोटिन्स (प्रथिनं), लिपिड (काही मेदांची संयुगं) व्हिटॅमिन्स (जीवनसत्वं), मिनरल्स (खनिजं) यावर होणारा परिणाम कमी असतो. असं सांगून या अहवालात मायक्रोव्हेवमध्ये काच किंवा जी सिरॅमिकची भांडी वापरली जाऊ शकतात अशा भांड्यांचा वापर करावा, प्लॅस्टिकची भांडी वापरू नयेत असं म्हटलं आहे. 'मायक्रोव्हेवचे नियम पाळावे लागतीलच' याबद्दल आयसीएमआर–एनआयएनच्या संचालिका डॉ. हेमलता आर यांनी बीबीसी मराठीला माहिती दिली. त्या सांगतात, आम्ही पारंपरिक स्वयंपाकपद्धतींपेक्षा मायक्रोव्हेव चांगला आहे असं सांगत नाही. परंतु जर तुमच्याकडे पर्याय नसेल तर मायक्रोव्हेव वापरू शकता. आपण समजत होतो तितका मायक्रोव्हेव वाईट नाही असं आम्हाला सुचवायचं आहे. अर्थात त्यासाठी तुम्हाला त्याचे नियमही पाळावेच लागतील, जसंही मायक्रोव्हेवमध्ये प्लॅस्टिक वापरणं अयोग्य आहे. त्यामुळे मायक्रोव्हेवमध्ये जे पूर्वी समजलं जात होतं की सर्वच पोषणमूल्य नष्ट होतात, तशी स्थिती नाहीये. तुम्ही मायक्रोव्हेवचा वापर आवश्यकतेनुसार करू शकता. तो तितका वाईट नाही. अर्थात मायक्रोवेव्हमध्ये जास्त वेळ अन्न गरम केल्यास त्यात 'ॲक्रिलेमाईड' नावाचं रसायन तयार होतं. यामुळे कॅन्सर होण्याची शक्यता निर्माण होते, असा इशारा काही तज्ज्ञ देतात.गॅस किंवा स्टोव्हवर जेवण गरम करण्याच्या तुलनेत मायक्रोवेव्हमध्ये जेवण करताना ॲक्रिलेमाईड जास्त प्रमाणात तयार होतं, असं काही तज्ज्ञ सांगतात. तुम्ही जर मायक्रोवेव्हमध्ये प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर करत असाल तर सावधान! हे तुमच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतं.मायक्रोवेव्हमधील उष्णता प्लास्टिकमधील विषारी अशा पॉलिमर कणांना सुटं करते. सुटं झाल्यानंतर हे पॉलिमर कण अन्नात मिसळतात.या पॉलिमरमुळे शरीरातील हार्मोन्सचं विघटन होऊ लागतं. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर मायक्रोवेव्हमध्ये कधीच करून नये.

## पु. ल. देशपांडे यांचे विचार



चोरीमध्ये वाईट काहीच नसतं, तुम्ही काय चोरता ह्याच्यावर ते अवलंबून आहे, तुम्ही जर एखाद्याच मन चोरले तर त्यात वाईट काय आहे. माणूस निरुत्तर झाला तरी हरकत नाही पण निष्प्रश्न झाला की संपलाच.कोणत्याही सुखाच्या क्षणी आपण होशमध्ये असणं यातच त्या क्षणाची अपूर्वाई आहे. मोठेपणी श्रीमंत हॉटेलात पार्ट्या देणाऱ्या मित्रांपेक्षा लहानपणी न मागता हातावर खोबऱ्याची वडी देणारी म्हातारी आठवते. सगळे वार परतवता येतील पण अहंकारावर झालेला वार परतवता येत नाही आणि पचवताही येत नाही समाजात बेअक्कल म्हणून मानली गेलेली कामे करायला कोणी येतं नाही. फुकट तर नाहीच नाही आणि ती उपयुक्त पण बेअक्कल कामे करणाऱ्यांना आपण हीन मानतो हे तर साऱ्या सामाजिक अनास्थेचे मूळ कारण आहे. क्रियापदाच मोठेपण त्याच्या कर्त्याने केलेलं कर्म किती मोठ आहे ह्याच्यावर अवलंबून असते. माणसाला माणूस जोडत गेलं पाहिजे खरं तर सगळे कागद सारखेच, फक्त त्याला अहंकार चिटकला की त्याच सर्टिफिकेट होत.

आपलाही कोणाला कंटाळा येऊ शकतो ही जाणीव फार भयप्रद आहे. घड्याळाच काय अन् माणसाचं काय, आतलं तोल सांभाळणारं चाक नीट राहिलं की फार पुढे ही जाण्याची भिती नाही आणि फार मागेही पडण्याची नाही.जुन्यात आपण रंगतो. स्मृतीची पाने उलटायला बोटांना डोळ्यातलं पाणी लागते. मग त्या स्मृती सुखाच्या असोत किंवा दु:खाच्या.माणसाचे केस गेलेले असले तरी चालतील पण माणुस हा गेलेली केस असु नये.भरलेला खिसा माणसाला जग दाखवतो आणि रिकामा खिसा जगातील माणस दाखवतो, ज्याला शंभर किलो धान्याचं पोत उचलता येतं, त्याला ते विकत घेता येत नाही आणि ज्याला विकत घेता येतं, त्याला उचलता येत नाही, विचित्र आहे पण सत्य आहे. जाळायला काही नसलं की पेटलेली काडीसुध्दा आपोआप विझते.काही माणसे जन्मता असे काही तेज घेऊन येतात, की त्यांच्यापुढे मी मी म्हणणारे उगीचच हतबल होतात.रातकिडा कर्कश ओरडतो यात वादच नाही. त्याचा त्रास होतो. पण त्याहीपेक्षा जास्त त्रास तो कुठे बसून ओरडतो हे सापडत नाही, याचा होतो. समजवण्यापेक्षा समजून घेण्यामध्ये खरी परीक्षा असते, कारण समजवण्यासाठी अनुभवाचा कस लागतो तर समजून घेण्यासाठी मनाचा मोठेपणा लागतो.

## निरोगी आणि चमकदार केसांसाठी हे १० आवश्यक पोषक आहेत

हे खरे आहे की आपण जे खातो त्याचा थेट परिणाम आपल्या त्वचेवर आणि केसांवर होतो. निरोगी आणि चांगल्या केसांसाठी, आपल्याला आपल्या आहाराकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्यामुळेच केसांची बाह्य काळजी सोबतच अंतर्गत काळजी देखील महत्वाची आहे.या लेखात आम्ही केसांसाठी आवश्यक पोषक तत्वांशी संबंधित माहिती घेऊन आलो आहोत. यासोबतच केसांसाठी कोणत्या पदार्थांचे सेवन करणे चांगले आहे हे देखील जाणून घेणार आहोत. केसांसाठी पोषक तत्वांचे महत्त्व काय आहे? त्वचेसोबतच केसांसाठीही पोषण आवश्यक आहे. संतुलित आणि पौष्टिक आहार तुम्हाला चमकदार, निरोगी आणि सुंदर केस देतो. केसांसाठी आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजे समृद्ध संतुलित आहार घेतल्यास केसांचे आरोग्य आणि वाढ होण्यास मदत होते. तसेच त्यांना निरोगी ठेवण्यास मदत होते. व्हिटॅमिन बी ६, बी १२ आणि फोलेट लाल रक्त पेशी तयार करण्यात मदत करतात, जे ऑक्सिजनसह पोषक तत्व शरीराच्या इतर पेशींमध्ये पोहोचवतात. यामध्ये स्कॅल्प आणि केस षेश्रश्रळलश्शी देखील समाविष्ट आहेत. शरीरात व्हिटॅमिन बी च्या कमतरतेमुळे केस गळणे, केसांची वाढ मंद होणे आणि तुटणे जास्त असते. १. प्रथिने: आपले केस प्रथिनांपासून बनलेले असतात. अशा परिस्थितीत मजबूत आणि निरोगी केसांसाठी प्रथिनयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करणे फायदेशीर ठरते. प्रथिनेयुक्त आहारासाठी, आपण आपल्या आहारात चिकन, मासे, दुग्धजन्य पदार्थ आणि अंडी समाविष्ट करू शकता. हे सर्व पदार्थ प्रथिनांनी समृद्ध असतात. या व्यतिरिक्त, तुम्ही प्रथिनांसाठी शेंगा आणि काजू देखील घेऊ शकता.





२. व्हिटॅमिन ए: सेबम हे केसांच्या कूपांशी संबंधित सेबेशियस ग्रंथींद्वारे तयार केले जाते. हा एक तेलकट पदार्थ आहे जो टाळूला नैसर्गिक कंडिशनर प्रदान करतो. सेबम तयार करण्यासाठी शरीराला व्हिटॅमिन ए आवश्यक आहे. व्हिटॅमिन ए साठी आहारात केशरी आणि पिवळ्या रंगाच्या भाज्या खाण्याचा सल्ला दिला जातो. जसे गाजर, भोपळा, रताळे इ.

३. आयरन: आयरन हे केसांसाठी आवश्यक असलेल्या खनिजांपैकी एक आहे. आयरनचे प्रमाण कमी असणे हे केस गळण्याचे मुख्य कारण मानले जाते. हे फॉलिकल्सला पोषक तत्वांचा पुरवठा विस्कळीत करून केसांच्या वाढीच्या चक्रावर परिणाम करते. लोहासाठी, तज्ञ आहारात लाल मांस, चिकन आणि मासे खाण्याची शिफारस करतात. लोहाच्या कमतरतेवर मात करण्यासाठी शाकाहारी लोक डाळींसोबत हिरव्या भाज्यांचे सेवन करू शकतात. जसे पालक, ब्रोकोली, केळी इ.

४. व्हिटॅमिन सी: शरीरात आयरनचे शोषण करण्यासाठी व्हिटॅमिन सी आवश्यक आहे. व्हिटॅमिन सी अँटीऑक्सिडंट म्हणून देखील कार्य करते. हे मुक्त रॅडिकल्सशी लढण्यास मदत करते जे केसांची वाढ आणि वृद्धत्व रोखतात. ब्लूबेरी, ब्रोकोली, पेरू, किवी, संत्री, पपई, स्ट्रॉबेरी, रताळे इत्यादी व्हिटॅमिन सीचे सर्वाधिक स्त्रोत आहेत.

५. झिंक : झिंक हे टाळूला सुरक्षित आणि निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक खनिजांपैकी एक आहे. झिंकच्या कमतरतेमुळे केस गळू शकतात. यासाठी आहारात अंड्यांसह फोर्टिफाइड तृणधान्ये आणि संपूर्ण धान्याचे सेवन करणे चांगले मानले जाते.

६. ओमेगा –३ फॅटी ॲसिडस्: ओमेगा –३ फॅटी ॲसिड कूप वाढवून केसांच्या वाढीस प्रोत्साहन देतात. केसगळतीपासूनही आराम मिळतो. ओमेगा –३ एक आवश्यक फॅटी ॲसिड आहे, जे शरीर स्वतः बनवू शकत नाही. त्यामुळे आहारात ओमेगा–३ समृद्ध असलेल्या गोष्टींचा समावेश करणे गरजेचे आहे.

## महात्मा बसवेश्वरमध्ये कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या नवोदित गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार

लातूर :– श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसेश्वर महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४–२५ ची प्रवेश प्रक्रिया दि. २८ मे २०२४ पासून स. १० ते साय. ०६ वा. पर्यंत (रविवार व सुट्टीच्या दिवशी सह) कनिष्ठ महाविद्यालयाचे अकरावी कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यवसाय अभ्यासक्रम आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एस. डब्यूव . व बी.सी.ए. प्रथम वर्षाचे प्रवेश सुरू झालेले आहेत. याला विद्यार्थी व पालकाकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा पालकांसह पुष्पगुच्छ व पेन देवून सत्कार महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश समितीतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

अकरावी विज्ञान शाखेत आजपर्यंत ९० टक्केच्या वर ०७ विद्यार्थ्यानी प्रवेश घेतलेला आहे. यामध्ये बेल्हाळे श्रुती विकास (९८ टक्के), कुरेशी बुशरा साहेब लाल (९६.६० टक्के), कांबळे प्रतीक्षा शिवाजी (९२.८० टक्के), चव्हाण मानसी मनोज (९२.६० टक्के), प्रयाग रूद्र राजेश (९१.४० टक्के), गदाडे श्रुती प्रभाकर (९१.४० टक्के), पांचाळ वरद प्रवीण (९०टक्के) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

अकरावी वाणिज्य शाखेत आजपर्यंत ८० टक्केच्या वर ०८ विद्यार्थ्यानी प्रवेश घेतला आहे. यामध्ये नाईकवाडे आयोध्या बाळासाहेब (८९.६० टक्के), मोठेराव तुळशी लक्ष्मण (८९.६० टक्के), जाधव स्वप्नांजली अंबादास (८६.८० टक्के), वाघमारे अंकिकेत उमाकांत (८६.६० टक्के), लोंढे अनिकेत बालाजी (८४.०० टक्के), गथाडे स्वीटी अंबादास (८२.६० टक्के), घोडके ऋषिकेश बालाजी (८२.४० टक्के), यादव अमर सतीश (८१.६० टक्के) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

अकरावी कला शाखेत (८० टक्के) च्या वर ०४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. पठाण अवेदखा अमजदखा (८९.८० टक्के), कांबळे सायली गोरखनाथ (८३.८० टक्के), स्वामी काशिनाथ सोमनाथ (८०.४० टक्के), कूकर स्नेहल नर्सिंग (८०.२० टक्के) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.



वरिष्ठ महाविद्यालयात बी. ए. प्रथम वर्षाला ११ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये आळंदकर राधा (७९.०० टक्के), आळंदकर शुभांगी (७१.८३ टक्के) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

बी. कॉम. प्रथम वर्षाला ३२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये राठी नितल (८४.१७ टक्के), मेनशेट्टी आदिती (८०.६७ टक्के) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

बी. एस्सी. प्रथम वर्षाला ११ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये कुरील प्रीती (७२.१७ टक्के) या विद्यार्थ्याथिणीचा समावेश आहे.

बी.एस.डब्यूया. प्रथम वर्षाला ०८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. यामध्ये माने आकांक्षा (७५.३३ टक्के), येणके वैष्णवी (७३.३३ टक्के), रामपुरे सनिका (६९.६७ टक्के) या विद्यार्थ्यांचा समावेश असून यामध्ये हासेगाव येथील सेवालयातील दोन विद्यार्थ्यांनीचा समावेश आहे.

बी.सी.ए. प्रथम वर्षाला ०४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

या सर्व प्रवेशीत गुणवंत विद्यार्थी व पालकांचे श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील (तपसेचिंचोलीकर), संस्थेचे सचिव ड माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडीगावे, संचालक राजेश्वर बुके, संचालक बस्वराज (राजू) येरटे, संचालक काशिनाथ साखरे, संचालिका ललिता पांढरे, संचालक राजेश्वर पाटील, संचालक बाबुराव तरगुडे, संचालक प्रभूप्पा पटणे, संचालक गुरुलिंग धाराशिवे आणि संचालक डॉ महेश हालगे यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे. वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रवेश समितीमध्ये डॉ. बाळासाहेब गोडबोले, डॉ. सदाशिव दंदे, डॉ. यशवंत वळवी, डॉ. आनंद शेवाळे, डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. रमेश तडवी, डॉ. मनोहर चपळे, प्रा. धोंडीबा भुरे, डॉ. शितल येरूळे यांचा समावेश असून शिक्षकेतर कर्मचारी म्हणून यशपाल ढोरमारे, संजय सोनवणे, केशव घंटे, रघु शिंदे, महादेव कोरे, जगन्नाथ येंचवाड, राम पाटील, नरेश वाडकर आणि अनिल कोळे हे उत्कृष्ट पद्धतीने कार्य करीत आहेत. कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रवेश समितीमध्ये उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, प्रा. वनिता पाटील, प्रा. नितीन वाणी, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. रविंद्र सोनवणे, प्रा. कल्पना गिराम, डॉ. घनश्याम ताडेवार, प्रा. व्यंकट दुडीले आणि प्रा. दयानंद टेंकाळे यांचा समावेश असून शिक्षकेतर कर्मचारी म्हणून नामदेव बेंदरगे, रघु शिंदे, दत्तात्रय पांचाळ, आनंद खोपे आणि राजाभाऊ बोडके हे उत्कृष्ट पद्धतीने कार्य करीत आहेत.

## पाणी टँकर माफियांवर कोणती कारवाई केली? सुप्रीम कोर्टाने केजरीवाल सरकारला फटकारले

पाणी प्रश्नी दिल्लीतील सर्वसामान्य जनता चिंतेत आहे. त्याची छायाचित्रे आम्ही प्रत्येक वृत्तवाहिनीवर पाहत आहोत. उन्हाळ्यात पाणीटंचाईची समस्या वारंवार उद्भवत असेल, तर पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी तुम्ही कोणती पावले उचलली आहेत? तुम्ही टँकर माफियांवर कोणती कारवाई केली. तुमच्याकडून कारवाई होत नसेल तर आम्ही दिल्ली पोलिसांना त्यांच्यावर कारवाई करण्यास सांगू, अशा शब्दांमध्ये दिल्लीतील भीषण पाणी टंचाई प्रश्नी सर्वोच्च न्यायालयाने आज (दि.१२) केजरीवाल सरकारला फटकारले.

हिमाचल प्रदेशातून पाणी येत असेल तर दिल्लीत पाणी जाते कुठे? इथे एवढी नासाडी, टँकर माफिया वगैरे.. याबाबत तुम्ही काय पावले उचलली? दिल्ली सरकारला या न्यायालयासमोर खोटी विधाने का दिली गेली हे स्पष्ट करा, असे निर्देशही यावेळी न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती प्रसन्ना बी वराळे यांच्या खंडपीठाने दिले.

दिल्ली सरकार सादर करणार प्रतिज्ञापत्र आजच्या सुनावणीवेळी दिल्ली सरकारच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, शहरातील पाणी टंचाई प्रश्नी केलेल्या उपाययोजनांचे प्रतिज्ञापत्र सादर करु. यामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांचे कनेक्शन थांबवणे आणि खंडित करणे समाविष्ट आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी उद्या (गुरुवार दि. १३ जून) पर्यंत पुढे ढकलली आहे.

# रेतीची वाहने जप्त करून लावली तहसील कार्यालयात काय कारवाई होणार? याकडे लागले नागरिकांचे लक्ष

## अवैध रेती वाहतुकीवर तहसीलदारांची कारवाई



किनवट / शेख शौकत :- किनवट तालुक्यातील अवैध रेती उत्खनन व वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली असून येथील तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी अवैध मोहीम पथक नियुक्त करून पथकाच्या कार्यवाहीने सपाटा लावला आहे. तहसील कार्यालयाचे प्रांगण येथे अवैध रेती उत्खनन व वाहतूक करणारे वाहने जप्त केली असून संपूर्ण प्रांगण या वाहनाने भरले आहे. आता या वाहनांवर पुढे काय कार्यवाही होईल, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. किनवट शहर व ग्रामीण भाग पैनगंगा नदीचा वळसा असून लागूनच विदर्भालगत अभयारण्य सीमा आहे. शहरात बांधकामाकरिता रेती लिलाव परवानगी नसल्यामुळे अवैध रेती तस्कर येथे सक्रिय आहेत तर काही अवैध रेती तस्करी विदर्भातील वन विभाग खात्याला हाताशी धरून रात्रीच्यावेळी सर्रास ट्रॅक्टरने रेतीचे वाहतूक शहरांमध्ये करतात. या सर्व बाबीची गांभीर्य घेत येथील तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी अवैध रेती तस्करांच्या शोधासाठी मोहीम हाती घेत पथक नियुक्त केले व अवैध रेती तस्करांच्या शोध मोहीम पथकांच्या धडाकेबाज कार्यवाहीमुळे अवैध तस्करांची धाबे दणाणले आहेत. महसूल विभागाचे महिला तलाठी यांचे पतीराज आपली पत्नी तलाठी असून आपल्यावर कार्यवाही होणार नाही असा गैरसमज स्वतःच् बाळगून रेतीची तस्करी करत असल्याची चर्चा असून यावर कार्यवाही होईल का? याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. नातलग तलाठ्यांच्या दुर्लक्षामुळे होतेयं उत्खनन महसूल विभागातील तलाठी हे आपले नातलग असून त्यांच्या पदाच्या बळावर अवैध रेती व उत्खनन तस्करी करत असल्याची चर्चा आहे. आपल्या नातलग तलाठी आहेत व आपल्यावर कार्यवाही होणार नाही असा गैरसमज बाळगत व गैरफायदा घेत नातलगाच्या पदाचा गैरवापर करत तस्करी करत असल्याचे चित्र दिसत आहे. यावरही आवर घालणे तेवढेच गरजेचे आहे.

# सह्याद्री देवराई राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित



लातूर :- सिने भिनेते सयाजी शिंदे यांच्या संकल्पनेतील सह्याद्री देवराई लातूर यांच्या वन संवर्धनाच्या कार्याचा दिलासा फाउंडेशन तर्फे राज्य स्तरीय पुरस्कार सेवालयाचे रवी बापटले , कवी योगीराज माने, आधार फाउंडेशन चे अँड प्रवीण पाटील , दिलासा फाउंडेशन चे अध्यक्ष दयानंद बिराजदार यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले दिलासा फोऊडेश चा पुरस्कार स्विकारण्यासाठी सह्याद्री देवराई चे सुपर्ण जगताप, डॉ सितम सोनवणे, डॉ बी आर पाटील, अँड सुनील गायकवाड, संतोष बालगीर, पुजा बोमणे, आकाश सोनकांबळे, संगीता बरुरे, आझम पठाण, वैष्णवी मोरे, राजकन्या फावडे,संदीप घुगरे हे उपस्थित होते.

# महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद

## शेतकऱ्यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या विविध

योजनांचा लाभ घ्यावा : मिलिंद घारड शिराढोण : महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने शेतकऱ्यांच्या सोयीसाठी विविध आकर्ष योजना सातत्याने राबविल्या जातात. या सर्व योजनांचा शेतकरी बांधवांनी नियमित लाभ घ्यावा आणि आपले व आपल्या परिवाराचे जीवन सुखकर बनवावे असे प्रतिपादन महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अध्यक्ष मिलिंद घारड यांनी केले.




महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने दि. ५ जून ते दि. १५ जून २०२४ या कालावधीत महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार , दि. ११ जून रोजी या यात्रेचे आगमन कळंब तालुक्यातील शिराढोण येथे झाले. शिराढोणमध्ये या यात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी ओमसाई मंगल कार्यालयात झालेल्या कार्यक्रमास बँकेचे सरव्यवस्थापक डी. एम. कावेरी , लातूरचे विभागीय व्यवस्थापक अविनाश कामतकर, टीम विकासचे प्रमुख बाळासाहेब घोगरे, नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी चैतन्य गोखले , शिराढोणच्या सरपंच लक्ष्मीबाई दिलीप म्हेत्रे, नॅचरल शुगरचे संचालक पांडुरंग आवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य शहाजीराव पाटील, उद्योजक उत्कर्ष संगवे , सौ. कांचनमाला संगवे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्र ग्रामीण बँकेमार्फत शेतकरी, महिला बचत गट, व्यापारी व उद्योजक, व्यावसायिक, गृह व व्यक्तिगत कर्ज वाटप केले जाते. शेतीसाठी पीक कर्ज किसान क्रेडिट कार्ड या योजनेमार्फत बँकांकडून उपलब्ध आहे. केंद्र सरकार व राज्य शासनाच्या वतीने शेतकरी बांधवांसाठी किसान क्रेडिट कार्ड रुपये तीन लाख पर्यन्त कर्जासाठी व्याज परतावा योजना लागू आहेत. माहिती व तंत्रज्ञान युगात योग्य माहिती नसल्यामुळे शासनाच्या व बँकाच्या योजनांचा लाभ मिळत नाही अथवा अर्धवट माहितीमुळे अशा लाभापासून शेतकऱ्यांना वंचित राहावे लागते. शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती पथनाट्याच्या माध्यमातून सोप्या पद्धतीने सांगण्यासाठी सदर महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रा काढण्यात आली आहे. या यात्रेच्या माध्यमातून बँक डिजिटलायझेशन बाबत प्रत्येक ग्रामीण नागरिकांना माहिती दिली गेली. त्या अनुषंगाने आर्थिक वित्तीय साक्षरता , वृक्षारोपण करण्यात आले. त्याचप्रमाणे यावेळी मान्यवरांच्या हस्ते नियमित कर्जदारांचा सत्कारही करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना बँकेचे अध्यक्ष मिलिंद घारड यांनी या यात्रेचा मूळ उद्देश्यच शेतकऱ्यांपर्यंत पोहचून त्यांना बँकेच्या वतीने त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती सोप्या पद्धतीने देणे हा असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांच्या प्रत्येक खात्यासाठी बँकेकडे योजना आहेत. त्याचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या शाखेस भेट द्यावी. आजच्या काळात केवळ शेतीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह शक्य नाही. त्याकरिता जोडधंद्यासाठी अर्थसहाय्य करण्यास आपली बँक सदैव तत्पर आहे. महिला बचत गटांनाही कर्जपुरवठा करण्यास आम्ही तयार असल्याचे घारड यांनी स्पष्ट केले. यावेळी नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी चैतन्य गोखले , सौ. कांचनमाला संगवे यांनीही आपले विचार व्यक्त केले. यावेळी सचिन माने, अनिरुद्ध जोशी, ईश्वर शेळके यांनी पीक कर्जाची आवश्यकता, वित्तीय साक्षरता , अपघाती जीवन विमा याविषयी माहिती देणारे पथनाट्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जगदीश जोशी यांनी तर आभार प्रदर्शन लातूरचे विभागीय उपव्यवस्थापक माधव पालेपाड यांनी केले.

# मनपाच्या ३२ कर्मचाऱ्यांना पदोन्नती आयुक्तांच्या हस्ते पदोन्नती आदेश प्रदान



लातूर/प्रतिनिधी : लातूर शहर महानगर पालिकेच्या आस्थापनेवरील विविध संवर्गात कार्यरत असणाऱ्या एकूण ३२ कर्मचाऱ्यांना अंतर्गत पदोन्नती देण्यात आली. मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या हस्ते त्यांना पदोन्नतीचे आदेश प्रदान करण्यात आले.

मनपामध्ये कार्यरत असणारे प्रदीप जोगदंड,संतोष लाडलापुरे, प्रविण कांबळे,बालाजी शिंदे, रंदावनी पवार,व छाया आखाडे , यांना वरिष्ठ लिपिक संवर्गात पदोन्नती देण्यात आली. वर्ग ४ च्या संवर्गामध्ये कार्यरत ज्ञानदेव पर्वते यांना स्वच्छता निरीक्षक पदावर तसेच वर्ग ४ संवर्गातील किरण कांबळे व अंकुश ताकपिरे यांना लिपिक टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्यात आली.तसेच मनपातील २३ कर्मचाऱ्यांना सफाई कामगार संवर्गातून मुकादम या पदावर पदोन्नतीचे आदेश देण्यात आले.

या सर्व कर्मचाऱ्यांना आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या हस्ते पदोन्नतीचे आदेश प्रदान करण्यात आले.यावेळी अतिरिक्त आयुक्त शुभम क्यातमवार,उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे, मुख्य लेखापरीक्षक तथा उपायुक्त (सा.प्र.) श्रीमती कांचन तावडे,मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख,अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पदोन्नती झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे आयुक्त व अधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

# श्री देशिकेंद्र ज्युनियर सायन्स कॉलेजमध्ये केदार शिंदे आणि पृथ्वीराज मेहत्रे यांचा सत्कार संपन्न



लातूर :- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित श्री देशीकेंद्र ज्युनियर सायन्स कॉलेजमधील केदार तुकाराम शिंदे यांनी नुकत्याच संपन्न झालेल्या नीट परीक्षा २०२४मध्ये ७२० गुणापैकी ६३५ गुण तर पृथ्वीराज संजय मेहत्रे याने ५७८ गुण प्राप्त केले. या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री आदिनाथ सांगवे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ आणि पेढे देऊन करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव ड माधवराव पाटील टाकळीकर, संचालक श्री राजेश्वर बुके, संचालक श्री बसवराज (राजू) येरटे, प्राचार्य डॉ. मनोज मोठे आणि कार्यालय प्रमुख श्री गुरूलिंग शेटे यांची उपस्थिती होती. या गुणवंत दोन्ही विद्यार्थ्यांचे संस्था पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. तसेच श्री देशीकेंद्र ज्युनिअरकॉलेजच्यापुढीलवाटचालीसाठीसुद्धाहार्दिकशुभेच्छादिल्या. श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर, एम.एस.बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय, लातूर, श्री देशीकेंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लातूर, श्री महात्मा बसवेश्वर प्राथमिक विद्यामंदिर व बालक मंदिर, लातूर, श्री शंभुलिंग शिवाचार्य प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालय, लातूर, श्री निळकंठेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लातूर, कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर, अल्लमप्रभू कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर, अभियांत्रिकी महाविद्यालय अंबाजोगाई, जि. बीड, कै. पूज्य टी.बी.गिरवलकर तंत्रनिकेतन महाविद्यालय, अंबेजोगाई जि. बीड अशा विविध शाळा, अभियांत्रिक आणि कला, वाणिज्य, विज्ञान, समाजकार्य, संगणकशास्त्र, व्यावसायिक महाविद्यालये चालविले जात असून या संस्थेद्वारेच श्री देशिकेंद्र ज्युनियर कॉलेज सुद्धा चालविले जाते. अल्पावधीतच या कॉलेजनी आपल्या शैक्षणिक कार्याचा ठसा संपूर्ण मराठवाड्यामध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आज या दोन विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केल्यामुळे इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल अशा आशावाद डॉ. मनोज मोठे यांनी व्यक्त केला. या गुणवंत विद्यार्थ्यांना संस्थेचे उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील (तपसेचिंचोलीकर), सहसचिव श्री सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक श्री प्रदीप दिंडीगावे, संचालक ड काशिनाथ साखरे, संचालिका सौ ललिता पांढरे, संचालक श्री राजेश्वर पाटील, संचालक श्री बाबुराव तरगुडे, संचालक श्री प्रभूप्पा पटणे, संचालक प्रा गुरुलिंग धाराशिवे आणि संचालक डॉ महेश हालगे यांनीही अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्राचार्य डॉ. मनोज मोठे यांनी केले. या सत्कार सोहळ्याला संस्थेतील सर्व संचालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# बोगस खते, बियाणे विक्री रोखण्यासाठी सतर्क राहून काम करावे - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर, दि. १२ (जिमाका) : जिल्ह्यात सर्वत्र चांगला पाऊस झाला असून आता खरीप पेरणीला सुरूवात झाली आहे. त्यामुळे बोगस बियाणे, खतांची विक्री होवू नये, यासाठी कृषि विभागाने सतर्क राहून काम करावे. यासाठी भरारी पथके स्थापन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. बियाणे, खते हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असून यावरच त्यांचा संपूर्ण खरीप हंगाम अवलंबून असल्याने चांगल्या दर्जाची बियाणे आणि खते उपलब्ध होण्यासाठी कृषि विभागाने आवश्यक कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले.




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात आयोजित कृषि निविष्ठा संनियंत्रण समिती बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर. टी. जाधव, जिल्हा परिषद कृषि विकास अधिकारी सुभाष झोले यांच्यासह उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, कृषि सेवा केंद्र असोसिएशनचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

पेरणी सुरू झाल्यानंतर बियाणे, खतांची मागणी वाढणार असून या काळात शेतकऱ्यांची अडवणूक, फसवणूक होवू नये, यासाठी खबरदारी घ्यावी. बोगस बियाणे, खतामुळे शेतकऱ्यांचा पूर्ण खरीप हंगाम वाया जावू शकतो. त्यामुळे जिल्ह्यात बोगस बियाणे, खते विक्री होवू नये, यासाठी कृषि विभागाने सतर्क राहावे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तालुकानिहाय पथके स्थापन करून त्यांच्यामार्फत कृषि सेवा केंद्रांची तपासणी करावी, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. तसेच आपण स्वतः कृषि सेवा केंद्रांची तपासणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बोगस बियाणे, खते रोखण्यासोबतच जादा दराने होणारी विक्री रोखणे, लिंकिंग होणार नाही, याचीही काळजी घ्यावी. असे गैरप्रकार करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करावी. शेतकऱ्यांना खतांचा वापर, रासायनिक औषधांच्या फवारणीबाबत कृषि विभागाने मार्गदर्शन करावे. जिल्ह्यात फळबाग लागवड, बांबू लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे. यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाची माहिती देवून अधिकाधिक क्षेत्रावर फळबाग लागवडीसाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. नोव्हेंबर किंवा डिसेंबर महिन्यात जिल्हास्तरीय सीताफळ महोत्सव आयोजित करून सीताफळ उत्पादक शेतकऱ्यांचा गौरव करावा. तसेच तृणधान्य लागवडीसाठीही शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE